## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र.1**

जळगाव दि. 5 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील हे दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी विद्यापीठात थेट प्राचार्यांशी संवाद साधणार आहेत. त्यांच्या या अनोख्या अशा `कुलगुरु-प्राचार्य संवाद पर्वा`चा प्रारंभ शनिवार,दि.13 ऑक्टोबर, 2018 पासून होत आहे.

नोव्हेंबर, 2016 मध्ये कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी `कुलगुरु-विद्यार्थी संवाद पर्वाला` प्रारंभ केला. गेल्या दोन वर्षापासून विद्यार्थ्यांच्या समस्या ऐकण्यासाठी दर महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या सोमवारी कुलगुरुंचा अर्धा दिवस राखून ठेवला जातो. आजवर असंख्य विद्यार्थ्यांनी कुलगुरुंशी प्रत्यक्ष संवाद साधून आपल्या अडचणी त्यांच्या कानी घातल्या. यातील बहुसंख्य समस्या तात्काळ मार्गी लावण्यात आल्या.

याचाच पुढचा भाग म्हणून आता जळगाव,धुळे, नंदुरबार या तीनही जिल्हयातील संलग्नीत महाविद्यालयातील प्राचार्यांसाठी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी दुपारी 3 वाजताचा वेळ राखून ठेवण्यात आला आहे. या उपक्रमाला कुलगुरु-प्राचार्य संवाद पर्व असे नाव देण्यात आले आहे. 13 ऑक्टोबर रोजी या संवाद पर्वाचा प्रारंभ होणार आहे. प्राचार्यांच्या विद्यापीठात प्रशासकीय पातळीवर असलेल्या अडचणी दूर व्हाव्यात यासाठी हा उपक्रम सुरु करण्यात येत आहे. संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य या दिवशी थेट कुलगुरुंची भेट घेवून आपल्या समस्या अथवा अडचणी मांडू शकतील. या अडचणी तातडीने दूर करण्यावर विद्यापीठाचा भर राहणार आहे. ऑगस्ट महिन्यात विद्यापीठात झालेल्या प्राचार्यांच्या बैठकीत कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी लवकरच हा उपक्रम सुरु करण्याचे सुतोवाच केले होते. या महिन्यात प्रा.पाटील यांच्या कुलगुरुपदाच्या कारकिर्दीला दोन वर्षे पूर्ण होत आहेत.

**बातमी क्र.2**

जळगाव दि.5 ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि कर्मवीर आ.मा.पाटील कला,वाणिज्य व कै.एन.के.पाटील विज्ञान महाविद्यालय, पिंपळनेर यांच्या संयुक्त विद्यमाने 10 ते 12 ऑक्टोबर या दरम्यान मौजे बारीपाडा ता.साक्री, जि. धुळे येथे विद्यापीठस्तरीय श्रमसंस्कार, व्यक्तीमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

10 ऑक्टोबर रोजी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते या कार्यशाळेचे उद्घाटन होणार असून पिंपळनेर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष आर.एन.शिंदे हे अध्यक्षस्थानी राहणार आहेत. व्यवस्थापन

परिषद सदस्य दिलीपदादा पाटील, प्राचार्य डी.एस.सुर्यवंशी आणि बारीपाडा येथील चैत्राम पवार हे प्रमुख अतिथी असतील. विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांनी तीन विद्यार्थी व तीन विद्यार्थिनी यांना या कार्यशाळेत पाठवून सहकार्य करावे असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे व प्राचार्य डॉ.एस.टी.सोनवणे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यशाळा प्रमुख प्रा.के.आर.राऊत (मो.नं.9421538927) किंवा प्रा.एस.के.काकडे (9423289659) यांच्याशी संपर्क साधावा.

---

जा.क्र. : कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : ५ ऑक्टोबर, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

**बातमी क्र.3**

जळगाव दि.5 (    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विद्यार्थी विकास विभागामार्फत विविध प्रशाळांमधील विद्यार्थ्यांनी केरळ पुरग्रस्तांसाठी जळगाव शहरातून मदतफेरीद्वारे जमा केलेला 1 लाख 2 हजार 175 रुपयांचा मदत निधी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला.

ऑगस्ट महिन्यात केरळ राज्यात आलेल्या पूरामुळे मोठे नुकसान झाले होते. विद्यापीठ प्रशाळांमधील विद्यार्थ्यांनी एकत्र येवून या पुरग्रस्तांना आर्थिक मदत व्हावी यासाठी जळगाव शहरात मदतफेरी काढण्याचा निर्धार केला आणि 320 विद्यार्थ्यांनी सुमारे तीन तास रविवारी फिरुन 1 लाख 2 हजार 175 रुपयांचा निधी जमा केला. खोटेनगर, पिंप्राळा, विद्यापीठ वसतिगृह परिसर, गणेश कॉलनी, शिव कॉलनी, भास्कर मार्केट, आदर्श नगर, गणपती नगर, ओंकारेश्वर मंदीर या परिसरात या विद्यार्थ्यांनी मदतफेरी काढली. नागरिकांनी उत्स्फूर्तपणे यथाशक्ती मदत केली. काही नागरीकांनी वस्तु स्वरुपात मदत करण्याची तयारी दर्शविली होती. मात्र केरळ सरकारने वस्तु स्वरुपात मदत न करता आर्थिक स्वरुपात मदत करावी असे आवाहन केले होते.

शुक्रवारी, कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात आला. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील उपस्थित होते. विद्यापीठामार्फत केरळ सरकारच्या पुरग्रस्त मदतनिधीच्या नावावर हा निधी जमा करण्यात येणार आहे. कुलगुरुंनी जळगावकरांचे यावेळी आभार मानून सहभागी प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या मदतफेरीत प्रभारी संचालक प्रा.एस.टी.इंगळे, समन्वयक डॉ.अजय पाटील, डॉ.दीपक दलाल, डॉ.निता पाटील, डॉ.पवित्रा पाटील, डॉ.सी.टी.आगे, डॉ.एस.टी.बेंद्रे, प्रा.मनोज पाटील, प्रा.एस.व्ही.कापसे, प्रा.एम.टी.गोडबोले, प्रा.एम.बी.सावळे, प्रा.एस.एस.भामरे, प्रा.दीपक सोनवणे, प्रा.वर्षा पालखे, प्रा.संजय पाटील यांनी विद्यार्थ्यांचे संघप्रमुख काम पाहिले.

---

जा.क्र. : कबचौउमवि/१६/हस्तदेय /२०१८ दिनांक : ५ ऑक्टोबर, २०१८

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी